**मुख्यमंत्री युवा कार्यप्रशिक्षण योजनेच्या अंमलबजावणीस मान्यता देण्याबाबत- अतिरिक्त सूचना**

**महाराष्ट्र शासन**
**कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : कौविउ-२०२४/प्र.क्र. ११८/प्रशा-२**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ०९ सप्टेंबर, २०२४.

**संदर्भ** :-

शासन निर्णय संकिर्ण-२०२४/प्र. क्र. ९०/व्यशि-३, दि. ०९.०७.२०२४.

**प्रस्तावना:-**

राज्यातील युवकांना त्यांच्या शिक्षणानंतर प्रत्यक्ष कामाचे प्रशिक्षण देऊन त्यांची रोजगार मिळण्याची क्षमता वाढविण्याकरीता संदर्भाधीन दि. ०९.०७.२०२४ च्या शासन निर्णयान्वये "मुख्यमंत्री युवा कार्यप्रशिक्षण योजना" कार्यान्वित करण्यात आली आहे. सदर योजनेच्या अंमलबजावणीचा वरिष्ठ स्तरावर वेळोवेळी आढावा घेण्यात येत आहे. योजनेच्या अंमलबजावणीबाबत विविध क्षेत्रीय कार्यालयांना निदर्शनास आलेल्या अडचणी दूर करण्याकरिता क्षेत्रीय कार्यालयांकडून प्राप्त सूचनांबाबत झालेल्या चर्चेनुसार तसेच योजनेचा व्यापक प्रचार होऊन अधिकाधिक उमेदवारांना कार्यप्रशिक्षणाच्या संधी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने **अतिरिक्त सूचना** निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

संदर्भाधीन दि. ०९.०७.२०२४ शासन निर्णयान्वये कार्यान्वित करण्यात आलेल्या मुख्यमंत्री युवा कार्यप्रशिक्षण योजनेचा व्यापक प्रचार होऊन अधिकाधिक उमेदवारांना कार्यप्रशिक्षणाच्या संधी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे:-

१) प्रस्तुत योजनेत सहभागी होण्यासाठी EPF, ESIC, GST, Certificate of Incorporation, Department for Promotion of Industries and Internal Trade (DPIIT) यांच्याकडील नोंदणी प्रमाणपत्र, केंद्र शासनाचे उद्योग उद्यम/उद्योग आधार यांच्याकडील नोंदणी प्रमाणपत्र यापैकी **कोणतेही एक प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात येईल**. संबंधित आस्थापनांनी या विभागाच्या संकेतस्थळावर ( www.rojgar.mahaswayam.gov.in ) नोंदणी करताना वरीलपैकी कोणतेही एक प्रमाणपत्र upload करणे आवश्यक राहील.

२) या योजनेंतर्गत आस्थापना/उद्योग/महामंडळामार्फत विना अनुभवी रोजगार इच्छुक पात्र उमेदवारांना संबंधित क्षेत्रातील प्रत्यक्ष कार्यप्रशिक्षण देण्यात येईल. तथापि, सदर प्रशिक्षणाअंती प्रशिक्षणार्थी उमेदवारास संबंधित आस्थापनेत कायमस्वरुपी नोकरीचा हक्क राहणार नाही.

३) संदर्भाधीन दि. ०९.०७.२०२४ शासन निर्णयातील परिच्छेद ४.१० रद्द करण्यात येत असून प्रशिक्षणार्थींच्या विद्यावेतनाबाबत पुढील तरतूद करण्यात येत आहे:-

"प्रशिक्षणार्थी उमेदवारास संबंधित आस्थापनेतील त्याच्या/तिच्या उपस्थितीनुसार (pro rata basis) विद्यावेतन दिले जाईल."

४) या योजनेंतर्गत प्रशिक्षण घेत असलेल्या प्रशिक्षणार्थी उमेदवारांना सुयोग्य विमाछत्र प्रदान करण्यात येईल व त्याबाबत स्वतंत्र आदेश निर्गमित करण्यात येतील.

५) प्रस्तुत योजनेंतर्गत उत्पादन (Manufacturing) क्षेत्रातील खाजगी आस्थापना/उद्योजकांना एकूण कार्यरत मनुष्यबळाच्या १० टक्के व सेवा (Service) क्षेत्रातील खाजगी आस्थापना/उद्योजकांना एकूण कार्यरत मनुष्यबळाच्या २० टक्के इतके उमेदवार कार्यप्रशिक्षणासाठी रुजू करुन घेता येतील.

केंद्र व राज्य शासनाच्या शासकीय / निमशासकीय आस्थापना/उद्योग/महामंडळे/स्थानिक स्वराज्य संस्था (ग्रामपंचायत वगळून) यांना त्यांच्या मंजूर पदांच्या ५ टक्के इतके उमेदवार या योजनेंतर्गत कार्यप्रशिक्षणासाठी रुजू करुन घेता येतील.

तसेच, मंजूर पदसंख्या २० पेक्षा कमी असलेल्या शासकीय/निमशासकीय आस्थापनांमध्ये व ग्रामपंचायत कार्यालयांत तसेच सहकार विभागाने निवड केलेल्या सक्षम प्राथमिक कृषि सहकारी सोसायटी (Primary Agriculture Cooperative Society- PACS) कार्यालयात प्रत्येकी एक उमेदवार प्रस्तुत योजनेंतर्गत कार्यप्रशिक्षणासाठी रुजू करुन घेता येईल.

शिक्षक/शिक्षकेतर कामांचा अनुभव घेण्यासाठी राज्य शासनाच्या अखत्यारितील शासकीय अनुदानित, विनाअनुदानित शैक्षणिक संस्थांमध्ये (प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक, महाविद्यालये, व्यावसायिक अभ्यासक्रम राबविणाऱ्या शैक्षणिक संस्था इत्यादी) प्रस्तुत योजनेंतर्गत कार्यप्रशिक्षणासाठी उमेदवार घेता येतील.

६) उद्योग आधार/उद्योग उद्यम यांच्याकडे नोंदणीकृत असलेल्या सुक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांतील (MSME) आस्थापनांना खालील प्रमाणात उमेदवार कार्यप्रशिक्षणासाठी रुजू करुन घेता येतील:-

| उद्योग उद्यम यांच्याकडे नोंदणीकृत MSME आस्थापनांतील कार्यरत मनुष्यबळाची संख्या | उत्पादन (Manufacturing) क्षेत्रातील MSME आस्थापनांना कार्यप्रशिक्षणाकरिता निवडण्यासाठी उमेदवारांची संख्या | सेवा (Service) क्षेत्रातील MSME आस्थापनांना कार्यप्रशिक्षणाकरिता निवडण्यासाठी उमेदवारांची संख्या |
|---|---|---|
| १० पर्यंत | १ | २ |
| ११ ते २० पर्यंत | २ | ४ |
| २० पेक्षा अधिक | कार्यरत मनुष्यबळाच्या १० टक्के | कार्यरत मनुष्यबळाच्या २० टक्के |

DPIIT यांच्याकडे नोंदणीकृत स्टार्ट अप्स (Start Ups) क्षेत्रातील आस्थापनांना खालील प्रमाणात उमेदवार कार्यप्रशिक्षणासाठी रुजू करुन घेता येतील:-

| DPIIT यांच्याकडे नोंदणीकृत Start Ups आस्थापनांतील कार्यरत मनुष्यबळाची संख्या | सदर Start Ups आस्थापनांना कार्यप्रशिक्षणाकरिता निवडण्यासाठी उमेदवारांची संख्या |
|---|---|
| १० पर्यंत | १ |
| ११ ते २० पर्यंत | २ |
| २० पेक्षा अधिक | कार्यरत मनुष्यबळाच्या १० टक्के |

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२४०९०९१८१४४७७२०३ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

SHRINIVAS JAGANNATH SHASTRI

Digitally signed by SHRINIVAS JAGANNATH SHASTRI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SKILLS EMPLOYMENT ENTREPRENEURSHIP AND INNOVATION DEPARTMENT, 2.5.4.20=562c9a4a27312e1de46dbbd470c2f1a3e466d159bc4c9bd7f2f9cc64766abce2, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=C02F19AC7E7AB3A50D817C95CF483E33229CF0CBB03283B175900630F81D2337, cn=SHRINIVAS JAGANNATH SHASTRI
Date: 2024.09.09 18:15:24 +05'30'

**( श्रीनिवास शास्त्री )**
**शासनाचे सह सचिव**

**प्रत,**

१) मा. राज्यपाल यांचे सचिव
२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३) मा.उपमुख्यमंत्री (गृह) यांचे सचिव
४) मा.उपमुख्यमंत्री (वित्त) यांचे सचिव
५) मा. मंत्री, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता यांचे खाजगी सचिव
६) मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा, विधान मंडळ सचिवालय, मुंबई.
७) मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद, विधान मंडळ सचिवालय, मुंबई.
८) मा. सचिव, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, मंत्रालय, मुंबई.
९) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई.
१०) आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई
११) सचिव/प्रधान सचिव/अपर मुख्य सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग
१२) सर्व जिल्हाधिकारी
१३) महालेखापाल, ( लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र -१/२, मुंबई/नागपूर.
१४) महालेखापाल, (लेखा परीक्षा), महाराष्ट्र -१/२, मुंबई/नागपूर.
१५) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
१६) सर्व उप आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता आयुक्तालय,
१७) सर्व सहायक आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र,
१८) निवडनस्ती- कार्यासन प्रशा-२